महाराष्ट्रातील जनतेचा आक्रोश, दैनिक नांदगांव

# आवाज

संपादक : भगवान सोनवणे

WWW.DAILYAWAZ.COM

RNI Reg. No.: MAHMAR/2014/66104 ■ वर्ष – १२ वे ■ अंक क्र. – २१४ ■ शुक्रवार दि.१३ मार्च २०२६ ■ किंमत – १ रूपया ■ पाने – ४

✲ उत्सुकता ✲

जिल्हा परिषद भवन नाशिक



## १७ ते २० मार्च दरम्यान राज्यात वादळी पावसाची शक्यता

**दै. आवाज वृत्तसेवा...**

मुंबई, दि. १३ मार्च : १७ ते २० मार्च दरम्यान राज्यातील काही भागांमध्ये प्रामुख्याने दुपारनंतर आभाळी हवामान तयार होऊन मेघगर्जनेसह पाऊस आणि वादळी वाऱ्यांची स्थिती निर्माण होण्याचा प्राथमिक अंदाज आहे. सध्याच्या अंदाजानुसार ही स्थिती प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा, खानदेश तसेच मध्य महाराष्ट्रातील भागांमध्ये दिसून येऊ शकते. या दरम्यान विजांचा कडकडाट, वादळी वारे, पाऊस आणि काही प्रमाणात गारपिटीची शक्यता देखील नाकारता येत नाही. सध्याच्या अंदाजानुसार १८ ते २० मार्च दरम्यान या हवामान घडामोडींची तीव्रता वाढण्याची शक्यता आहे.

शेतकऱ्यांनी पुढील काही दिवस हवामानाच्या अद्ययावत अंदाजांकडे लक्ष ठेवावे व त्यानुसार शेतीची कामे नियोजित करावीत. सध्या रब्बी पिकांची काढणी सुरू असल्याने शेतकऱ्यांनी काढणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावीत किंवा झाकून ठेवण्याची व्यवस्था करावी. तसेच वादळी वारे, पाऊस आणि संभाव्य गारपीटीपासून पिकांचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे.

## परराज्यातील अवैध मद्य वाहतूक प्रकरणी कारवाई; २ कोटी ३० हजाराचा मुद्देमाल जप्त

**दै. आवाज वृत्तसेवा...**

मुंबई, दि. १२ : ठाणे जिल्ह्यातील मुंबई – नाशिक महामार्गावर पडघा टोल नाक्याजवळ (ता. भिवंडी) येथे परराज्यातील मद्याची वाहतूक करणाऱ्या वाहनावर उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने कारवाई केली.



या कारवाईत गोवा स्पिरिट ऑफ स्मूथनेस व्हिस्कीच्या फॉर सेल इन ओन्ली मध्यप्रदेश या परराज्यातील विदेशी मद्याचे २ हजार ३६४ बॉक्स मिळून आले. तसेच एमएच १२ टीव्ही ९००० क्रमांक असलेल्या १६ चाकी वाहनासह, दोन मोबाईल फोन असा एकूण २ कोटी ३० हजार ८०० रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईत वाहनामधील आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ चे विविध कलमान्वये गुन्हा नोंद करून दोघांना अटक करण्यात आली आहे. राज्य उत्पादन शुल्कचे आयुक्त डॉ राजेश देशमुख, सहआयुक्त प्रसाद सुर्वे यांच्या आदेशानुसार कोकण विभागाचे विभागीय उपआयुक्त प्रदीप पवार यांचे मार्गदर्शनाखाली कोकण विभागाच्या भरारी पथकाकडून कारवाई करण्यात आली. या गुन्ह्याचा पुढील तपास दुय्यम निरीक्षक रिंकेश दांगट करीत आहे, असे विभागीय भरारी पथकाचे दुय्यम निरीक्षक यांनी कळविले आहे. गुन्ह्याचा पुढील तपास विभागीय भरारी पथकाचे निरीक्षक दिगंबर शेवाळे करीत आहेत.

## गॅस सिलिंडर पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी अन्न, नागरी पुरवठा विभागामार्फत राज्यभर नियंत्रण कक्ष; जिल्हास्तरीय समित्या स्थापन

**दै. आवाज वृत्तसेवा...**

मुंबई, दि. १२ : इराण-इस्रायल युध्दाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या घरगुती व व्यावसायिक वापराच्या गॅस सिलेंडर सुरळीत पुरवठ्याबाबत राज्य शासन विविध उपाययोजना राबवत आहे. घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होऊ नयेत आणि संभाव्य टंचाईच्या परिस्थितीत समन्वय साधता यावा, यासाठी राज्य शासनाने जिल्हास्तरावर विशेष समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.

संपूर्ण राज्यामध्ये एलपीजी सुरळीत ठेवण्याविषयी तसेच पुरवठ्यावर नियंत्रण ठेवण्याच्या अनुषंगाने आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर यांनी दिले आहेत.

घरगुती गॅस सिलिंडरचा पुरवठा सुरळीत होत राहील, याची नागरिकांनी निश्चिंतता बाळगावी, अशी ग्वाही अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण विभागामार्फत देण्यात आली आहे.

मार्च महिन्यामध्ये गेल्या सहा महिन्याच्या तुलनेत अधिक प्रमाणात घरगुती गॅस सिलेंडर उपलब्ध असून युध्दाच्या पार्श्वभूमीवर घरगुती गॅस सिलिंडर पुरवठा सुरळीत राहील याची खबरदारी घेण्याच्या सूचना विभागामार्फत सर्व संबंधित यंत्रणांना देण्यात आल्या आहेत.

### जिल्हास्तरावर विशेष समित्या स्थापन

घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होऊ नयेत आणि संभाव्य टंचाईच्या परिस्थितीत समन्वय साधता यावा, यासाठी राज्य शासनाने जिल्हास्तरावर विशेष समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, जिल्हा पुरवठा अधिकारी आणि सर्व सरकारी गॅस कंपन्यांचे अधिकारी यांचा या समित्यांमध्ये समावेश असेल. गॅस पुरवठा साखळीवर देखरेख ठेवणे, कायदा व सुव्यवस्था राखणे तसेच दररोज परिस्थितीचा आढावा घेऊन अहवाल सादर करणे ही समित्यांची प्रमुख जबाबदारी असेल.

मुंबई-ठाणे रेशनिंग क्षेत्रात नियंत्रक, रेशनिंग यांच्या नियंत्रणाखाली स्थापन केलेल्या समितीत पोलीस उप आयुक्त आणि उपनियंत्रक (रेशनिंग) समितीत समावेश करण्यात येणार असून मुंबई आणि ठाणे शहरातील सर्व उपायुक्तांशी सह पोलीस आयुक्त (प्रशासन) समन्वय साधणार आहेत. पर्यायी इंधनाच्या वापराची शक्यता तपासण्याचे निर्देशही यंत्रणांना देण्यात आले आहेत. यामध्ये कोळसा, रॉकेल आदी पर्यायांचा विचार केला जाणार असला तरी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमांचे काटेकोर पालन करणे बंधनकारक राहणार आहे. तसेच जिल्हास्तरीय समित्यांनी हॉटेल व रेस्टॉरंट संघटनांसोबत बैठक घेऊन पर्यायी इंधनाच्या वापरासाठी प्रोत्साहन देण्याचे निर्देश दिले आहेत.

### अत्यावश्यक सेवांना एलपीजी पुरवठा प्राधान्याने

रुग्णालये, शासकीय वसतिगृहे, शासकीय शाळा/महाविद्यालयांमधील मेस, मध्यान्ह भोजन योजना, शासकीय आश्रमशाळा आदी अत्यावश्यक सेवा देणाऱ्या संस्थांना घरगुती/व्यावसायिक गॅसचा पुरवठा प्राधान्याने देण्यात येणार असून अशा संस्थांची यादी प्रसिध्द करण्यात येणार आहे. अत्यावश्यक सेवांना एलपीजी पुरवठा प्राधान्याने देण्यासाठी स्वतंत्र प्राधान्यक्रमही निश्चित केला जाणार आहे.

गॅस पुरवठ्याबाबत अफवा पसरू नयेत, यासाठी दररोज रेडिओ, एफएम, दूरदर्शन तसेच मुद्रित माध्यमांद्वारे माहिती देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आणि जिल्हा समित्या यांसंदर्भातील जबाबदारी पार पाडतील समाज माध्यमांवरील खोट्या/बनावट बातम्यांवरही कारवाई करण्यात येणार आहे.

गॅस बुकींग ॲप आणि मिस्ड कॉल सेवांमध्ये येणाऱ्या तांत्रिक अडचणी तातडीने दूर करण्याचे निर्देश तेल कंपन्यांना देण्यात आले आहेत. तसेच राज्य, विभाग, जिल्हा आणि तालुका स्तरावर नियंत्रण कक्ष तातडीने सुरू करून तक्रार निवारणासाठी व्हॉट्सॲप सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

आगामी धार्मिक सण व उत्सवांचा विचार करून सार्वजनिक संस्थांना एलपीजी सिलिंडरचा पुरवठा अखंड ठेवण्यासाठी प्राधान्य राहील. गॅस सिलिंडर पुरवठ्या संदर्भात नागरिकांमध्ये घबराट निर्माण होऊ नये, यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि ग्रामपंचायत सदस्यांची मदत घेण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. एलपीजी वाहतूक करणाऱ्या वाहनांना तसेच गॅस एजन्सींना आवश्यक पोलीस संरक्षण देण्याची जबाबदारी पोलिस प्रशासनावर सोपविण्यात आली आहे.

जिल्हा प्रशासन, रेशनिंग नियंत्रक आणि तेल कंपन्यांनी दररोज साठा स्थिती व अद्ययावत अहवाल राज्यस्तरीय नियंत्रण कक्षाला सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

राज्यात घरगुती एलपीजीचा तुटवडा नाही – महाराष्ट्र राज्यात दररोज सरासरी सुमारे ९,००० मेट्रिक टन एलपीजी ची मागणी असते. ही मागणी पूर्ण करण्यासाठी रिफायनरीमधील एलपीजी उत्पादन वाढविण्यात आले असून, गेल्या दोन दिवसांत दैनिक उत्पादन ९,००० मेट्रिक टनांवरून ११,००० मेट्रिक टनांपर्यंत वाढविण्यात आले आहे. त्यामुळे राज्यात घरगुती एलपीजीचा कोणताही तुटवडा नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. घरगुती गॅसची मागणी पूर्ण करण्याइतके पुरेसे उत्पादन आणि साठा उपलब्ध आहे.

व्यावसायिक एलपीजीच्या बाबतीत केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्राधान्यक्रम निश्चित करण्यात आले आहेत. त्यानुसार रुग्णालये, शाळांमधील मध्यान्ह भोजन योजना, शासकीय आश्रमशाळा, सामुदायिक स्वयंपाकगृहे (कम्युनिटी किचन), तसेच शासकीय शाळा व महाविद्यालयांच्या मेस यांसारख्या अत्यावश्यक सेवांना प्राधान्य देण्यात येत आहे. उपलब्ध उत्पादनातून या सर्व गरजा पूर्ण होऊ शकतात.

घरगुती वापरासाठीच्या पाइप्ड नॅचरल गॅस (पीएनजी) चा देखील पुरेसा साठा उपलब्ध आहे. इंधनाच्या बाबतीतही राज्यात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. बाजारातील मागणी पूर्ण करण्यासाठी राज्यातील रिफायनरी पूर्ण क्षमतेने कार्यरत असून दररोज सुमारे १५,००० किलो लिटर पेट्रोल आणि ३८,००० किलो लिटर डिझेल या मागणीची पूर्तता केली जात आहे. त्यामुळे इंधन पुरवठ्याबाबत नागरिकांनी काळजी करू नये असे आवाहन विभागामार्फत करण्यात आले आहे.



## हाफ मॅरेथॉन यशस्वीरीत्या संपन्न




**दै. आवाज वृत्तसेवा...**

महाड : आरोग्य, एकता आणि स्थानिक सहभागाला नवी दिशा मिळावी याकरिता आदित्य बिर्ला ग्रुपच्या ग्रासिम इंडस्ट्रीजचा भाग असलेल्या बिर्ला ओपस पेंट्सने नुकतीच महाड हाफ मॅरेथॉनचा दुसरा पर्व यशस्वीरीत्या पूर्ण केला. महाराष्ट्रातील समाजाभिमुख उपक्रम आणि सर्वांगीण विकासासाठीच्या त्यांच्या बांधिलकीतील हा आणखी एक महत्त्वाचा टप्पा ठरला. मॅरेथॉन सकाळी ५:०० वाजता काकड तळे ग्राउंड, बाजारपेठ, काकरतळे, महाड येथून सुरू झाली. हिरवाईने नटलेल्या महाडच्या निसर्गरम्य पार्श्वभूमीवर २१.१ किमीचा मार्ग धावपटूंना सहनशक्ती, उत्साह आणि सामुदायिक भावनेचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला. या स्पर्धेत हजारो धावपटू, कुटुंबे आणि फिटनेसप्रेमी सहभागी झाले. बिर्ला ओपस पेंट्सच्या प्रमुख सामुदायिक उपक्रमांपैकी एक असलेली ही मॅरेथॉन केवळ क्रीडा स्पर्धा नसून औद्योगिक प्रगतीसोबत स्थानिक कल्याणही साध्य व्हावे, या कंपनीच्या तत्त्वज्ञानाचे प्रतीक आहे. महाडमधील अत्याधुनिक उत्पादन केंद्राजवळ आयोजित झालेल्या या धावण्याने कंपनी आणि स्थानिक समाजातील दृढ नात्याला अधोरेखित केले. या कार्यक्रमाला बिर्ला ओपस पेंट्सचे सीओओ अजित कुमार यांच्यासह महाडचे महापौर सुनील कविस्कर, उपमहापौर संदीप जाधव, तसेच पोलीस निरीक्षक संदीप भोसले उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीने या उपक्रमाला स्थानिक प्रशासनाचे बळकटीकरण मिळाले.

## मीडिया एक्स्पो ९ पासून




नाशिक : इनडोअर आणि आऊटडोअर जाहिरात तसेच साईनेज सोल्यूशन्ससाठीची आंतरराष्ट्रीय व्यापार प्रदर्शनी मीडिया एक्स्पो मुंबई २०२६ ची ५७ वी आवृत्ती ९ ते ११ एप्रिलदरम्यान बॉंबे एक्झिबिशन सेंटर येथे आयोजित करण्यात येणार आहे. या प्रदर्शनात जागतिक आघाडीच्या ब्रॅंड्स आणि सर्जनशील व्यावसायिकांना एकत्र आणत भविष्यातील अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे दर्शन घडवले जाणार आहे. मागील आवृत्त्यांच्या यशावर आधारित या वर्षीच्या प्रदर्शनात डिजिटल साईनेज तसेच पीओपी/पीओएसएम सोल्यूशन्सवर अधिक भर देण्यात येणार आहे. रिटेल, ब्रँडिंग आणि आउट-ऑफ-होम (ओ-ओएच) माध्यमांमध्ये तंत्रज्ञानाधारित दृश्य संवादाची वाढती गरज लक्षात घेऊन ही दिशा निश्चित करण्यात आली आहे. उद्योगातील वाढत्या डिजिटल विस्ताराच्या पार्श्वभूमीवर बिलबोर्ड आणि आऊटडोअर जाहिरात क्षेत्रानेही भक्कम वाढ नोंदवली आहे. ग्रॅण्ड व्ह्यू रिसर्चच्या अहवालानुसार, भारतातील बिलबोर्ड आणि आऊटडोअर जाहिरात बाजाराने २०२५ मध्ये ५७६.३ दशलक्ष अमेरिकी डॉलर्स इतका महसूल निर्माण केला असून, २०३३ पर्यंत हा आकडा १०७५.५ दशलक्ष अमेरिकी डॉलर्सपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे.

## युद्धाच्या सावटात भारतासाठी इराणचा खुला समुद्री मार्ग

**दै. आवाज वृत्तसेवा...**

मध्यपूर्वेतील वाढत्या तणावामुळे जागतिक राजकारण पुन्हा एकदा अस्थिरतेच्या टप्प्यावर उभे आहे. विशेषतः आणि यांच्यातील वाढती वैरभावना, तसेच समुद्री मार्गांवरील संभाव्य संघर्षामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार व्यवस्थेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. जगातील मोठ्या व्यापारी राष्ट्रांसाठी पश्चिम आशियातील समुद्री मार्ग अत्यंत महत्त्वाचे मानले जातात. अशा परिस्थितीत भारतीय व्यापारी जहाजांना तुलनेने सुरक्षित मार्ग उपलब्ध होत असल्याचे चित्र समोर येते. ही बाब केवळ योगायोग नसून भारताच्या संतुलित परराष्ट्र धोरणाचा आणि दीर्घकालीन कूटनीतिक विश्वासाचा परिणाम म्हणून पाहावी लागेल.



**लेखक**

**श्री योगेश अशोक चकोर**

शिक्षक (संरक्षण व आंतरिक शास्त्र) भोंसला मिलिटरी स्कूल नाशिक मो.क्र. ८१४९८८९७४३

भारत आणि इराण यांचे संबंध केवळ राजकीय पातळीवर मर्यादित नाहीत, तर त्यांना ऐतिहासिक आणि सांस्कृतिक अधिष्ठान लाभलेले आहे. प्राचीन काळापासून दोन्ही देशांमध्ये व्यापार आणि सांस्कृतिक देवाणघेवाण सुरू होती. आधुनिक काळात या संबंधांना ऊर्जा, व्यापार आणि प्रादेशिक सहकार्याची जोड मिळाली आहे. त्यामुळे मध्यपूर्वेतील तणाव वाढला तरी भारताशी संबंध बिघडवणे इराणसाठी हिताचे नाही.

या संबंधांना अधिक सामरिक स्वरूप देणारा प्रकल्प म्हणजे . या बंदराच्या विकासात भारताने केलेली गुंतवणूक ही केवळ आर्थिक नव्हे तर भू-राजकीय दृष्टिकोनातूनही महत्त्वाची मानली जाते. या बंदराच्या माध्यमातून भारताला तसेच मध्य आशियातील देशांशी थेट व्यापारमार्ग उपलब्ध होतो. त्यामुळे हा प्रकल्प भारतासाठी धोरणात्मकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा ठरतो. दुसऱ्या बाजूला इराणलाही या प्रकल्पामुळे आंतरराष्ट्रीय व्यापाराचे नवीन मार्ग उपलब्ध होतात. परिणामी दोन्ही देशांचे हितसंबंध परस्परांशी जोडले गेले आहेत.

भारताच्या परराष्ट्र धोरणातील संतुलन हा या परिस्थितीतला आणखी एक महत्त्वाचा पैलू आहे. भारताने मध्यपूर्वेतील विविध देशांशी समतोल संबंध राखण्याचा मार्ग स्वीकारला आहे. एका बाजूला संरक्षण आणि तंत्रज्ञान सहकार्यामुळे सोबत भारताचे संबंध दृढ होत आहेत, तर दुसऱ्या बाजूला सोबत ऊर्जा आणि प्रादेशिक सहकार्य कायम ठेवले आहे. या संतुलित भूमिकेमुळे भारत कोणत्याही संघर्षात उघडपणे एका बाजूला उभा राहत नाही. परिणामी संघर्षाच्या काळातही भारताविषयी तुलनेने सकारात्मक दृष्टीकोन तयार होतो.

याशिवाय भारताची आंतरराष्ट्रीय प्रतिमा ही जबाबदार आणि विश्वासार्ह व्यापारी भागीदार अशी आहे. भारतीय जहाजे प्रामुख्याने नागरी आणि व्यापारी मालवाहतुकीत गुंतलेली असतात. त्यांचा युद्धाशी थेट संबंध नसतो. त्यामुळे अशा जहाजांना लक्ष्य केल्यास अनावश्यक आंतरराष्ट्रीय तणाव निर्माण होण्याची शक्यता असते. इराणसारख्या देशालाही अशा परिस्थितीत व्यापारमार्ग पूर्णपणे धोक्यात घालणे परवडणारे नाही.

मात्र या परिस्थितीकडे केवळ सवलत म्हणून पाहणेही योग्य ठरणार नाही. कारण मध्यपूर्वेतील संघर्षाचे स्वरूप अत्यंत गुंतागुंतीचे आहे. कोणत्याही क्षणी परिस्थिती बदलू शकते. त्यामुळे भारताने आपल्या व्यापारी आणि ऊर्जा सुरक्षेसाठी पर्यायी मार्ग आणि रणनीती तयार ठेवणे तितकेच आवश्यक आहे. भारतीय नौदलाची समुद्री सुरक्षेतील भूमिका, तसेच जागतिक स्तरावरील कूटनीतिक संवाद यांना यापुढे अधिक महत्त्व प्राप्त होणार आहे.

या पार्श्वभूमीवर भारतीय जहाजांसाठी खुला राहिलेला समुद्री मार्ग हा भारताच्या परराष्ट्र धोरणातील दूरदृष्टीची साक्ष देणारा आहे. आजच्या बहुध्रुवीय जगात केवळ लष्करी सामर्थ्य नव्हे तर संतुलित कूटनीती, आर्थिक सहकार्य आणि विश्वासार्हता हे घटकही तितकेच महत्त्वाचे ठरतात. भारताने या सर्व घटकांचा समतोल साधण्याचा प्रयत्न केला आहे. युद्धाच्या सावटातही भारतीय जहाजांसाठी खुला राहिलेला हा मार्ग त्या व्यापक कूटनीतिक परिपक्वतेचेच प्रतीक मानावे लागेल.

**लेखक,**
**श्री योगेश अशोक चकोर**
**संरक्षण व सामरिक शास्त्र अभ्यासक**
**नाशिक**

## आमदार सत्यजित तांबे याच्या निधीतून सुरगाणा तालुक्यातील शाळांना पोडियम संचांचे वितरण

**दै. आवाज वृत्तसेवा....**

लक्ष्मण पवार, हतगड..सुरगाणा तालुक्यातील विविध शाळांना पोडियम संचांचे वितरण करण्यात आले. आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक शैक्षणिक साधनसामग्रीचा लाभ मिळावा या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.



दगा शंकर हिरे माध्यमिक शाळा करवंदे, प्राथमिक आश्रम शाळा श्रीभुवन, स्वामी विवेकानंद ज्युनियर कॉलेज बाऱ्हे, पंडित जवाहरलाल नेहरू माध्यमिक आश्रम शाळा कुकुडणे, गिरजादेवी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक समन्वयक वसंत राठोड, एन. डी. सोनवणे व तुषार गावंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना तहसीलदार राठोड म्हणाले की, ग्रामीण व आदिवासी भागातील आदिवासी विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षण पद्धतीचा लाभ मिळण्यास मदत होणार असून शिक्षक व विद्यार्थ्यांकडून या उपक्रमाचे स्वागत करण्यात आले.

## वंदे मातरम गीत निर्मितीच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवानिमित्त कार्यशाळेचे आयोजन

**दै. आवाज वृत्तसेवा....**

नासिक - वंदे मातरम या घोषवाक्यातून भारतीय स्वातंत्र्यलढ्याची प्रेरणा, जाज्वल्य राष्ट्रनिष्ठा, स्वातंत्र्यसंग्रामात लढणाऱ्या क्रांतीकारकांना मिळाली, त्याचमुळे आपण इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त होऊ शकलो. असे प्रतिपादन विवेकविचार मंचाचे समन्वयक तथा उद्योजक जयेश क्षेमकल्याणी यांनी केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व गोखले एज्युकेशन संस्थेचे बिटको महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने वंदे मातरम गीत निर्मितीच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवानिमित्त आयोजित कार्यशाळेत ( ता.११) प्रमुख पाहुणे म्हणून क्षेमकल्याणी बोलत होते. यावेळी व्यासपीठावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे वंदे मातरम उपक्रम समितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापन परिषद सदस्य सागर वैद्य, अध्यक्षस्थानी गोखले एज्युकेशन संस्थेचे विभागीय सचिव डॉ.




राम कुलकर्णी, प्रभारी प्राचार्य डॉ. कृष्णा शहाणे, पुणे विद्यापीठाचे अधिसभा सदस्य अनुक्रमे राहुल पाखरे,प्रा. डॉ. चिंतामण निगळे, कृष्णा भंडलकर, प्राचार्य डॉ. संपत काळे सहा. कुलसचिव डॉ. अजय ठुबे , डॉ.संपत काळे कार्यशाळेचे संयोजक तथा कलाशाखेचे उपप्राचार्य डॉ.अनिलकुमार पठारे , वाणिज्य शाखेचे उपप्राचार्य डॉ.आकाश ठाकूर आदी उपस्थित होते.क्षेमकल्याणी पुढे म्हणाले की, वंदे मातरम या प्रेरणा गीताची १८७५ मध्ये निर्मिती करणारे कवी बंकिमचंद्र चटर्जी यांनी तमाम भारतीयांच्या मनात देशभक्तीचे स्फूल्लिंग पेटवले. जेव्हा जेव्हा भारतीयांना ब्रिटिशांविरुद्धची गुलामगिरी गप्प बसू देत नव्हती त्यावेळी स्वातंत्र्यवीर सावरकर खुदीराम बोस यांच्यासह अनेक स्वातंत्र्यवीर आपल्या कुटुंबाचा त्याग करून देशाच्या स्वातंत्र्यसंग्रामात सहभागी झाले या चळवळीमध्ये सुमारे ३२ युवक फासावर चढले या सर्व युवकांच्या हृदयात वंदे मातरम या देशभक्तीपर गीताची प्रेरणा होती. आज आपण जे स्वातंत्र्याचे फलित बघतो आहोत त्याच्या पाठीमागे असंख्य युवक असंख्य स्वातंत्र्यवीर लढले आणि आपल्या मातृभूमीसाठी शहीद झाले. या सर्वांचे कृतज्ञ स्मरण आजच्या वंदे मातरम या शतकोत्तरी अजरामर ठरलेल्या गीताने करूया असेही क्षेमकल्याणी यांनी सांगितले. डॉ. राम कुलकर्णी यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनामध्ये राष्ट्रभक्तीचे मूल्य रुजवावे असे आवाहन केले. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. कृष्णा शहाणे यांनी कार्यशाळेसाठी आलेल्या पुणे विद्यापीठातील सर्व अधिसभा सदस्यांचे यथोचित स्वागत केले. तर आपल्या प्रास्ताविकपर मनोगतातून उपप्राचार्य प्रा.डॉ. अनिलकुमार पठारे यांनी वंदे मातरम या शब्दाभोवती असलेले क्रांतीचे वलय तसेच या काव्याला असलेला अजरामर इतिहास यावेळी सांगितला. कार्यशाळेत सहभागी झालेले अधिसभा सदस्य राहुल पाखरे तसेच सागर वैद्य आदींनी मनोगत व्यक्त केले. महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी स्वागत गीत सादर केले. तसेच सूत्रसंचालन डॉ. सुधाकर बोरसे, व प्रा. वृषाली उगले यांनी केले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी,प्रा. फारूक मुलानी यांनी कार्यशाळेचे आभार प्रदर्शन केले. या कार्यशाळेसाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक, भगवान नामदेव सोनवणे यांनी शार्प ऑफसेट, मालेगांव बस स्टॅंड समोर, मालेगांव येथे छापून ढासे मळा, सावता नगर, नांदगांव ता.नांदगांव, जि.नाशिक येथे प्रकाशित केले. सहसंपादक भाऊसाहेब हुजबंद. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या, लेख, जाहिराती यामधून व्यक्त झालेल्या मतांशी मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक, सहसंपादक सहमत असतीलच असे नाही. मुद्रण दोष संभवनीय. (नांदगांव न्यायकक्षेत) सर्व अधिकार सुरक्षित. मो. ९५४५९१०१७७ - ९२७२४५३९२१ email : nandgaonawaz@gmail.com

# नगरसुल रेल्वे अंडरपास बोगदा अरुंद वळणामुळे वारंवार अपघात, अपघातास रेल्वे प्रशासन जबाबदार

दै. आवाज वृत्तसेवा...

लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी - नगरसुलयेथील रेल्वे अंडरपास बोगद्याचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाले असून या बोगद्यात वारंवार अपघात होऊन वाहन धारकांचे मोठे नुकसान याला जबाबदार रेल्वे प्रशासन असल्याची खंत वाहनधारक करत आहे. येवला नांदगाव राज्य मार्ग क्रमांक २५ असून या राज्य मार्गावरून मोठ्या प्रमाणात वाहतूक असून ही वा-हतूक जळगाव ,चाळीसगाव, भुसावळ, नांदगाव, बोलठाण ,मालेगाव, नंदुरबार खानदेशातील अनेक गावांची वाहतूक या राज्य मार्गाने शिर्डी, पुणे, कोकण, गोवा, मोठ्या प्रमाणात होत असून हा मार्ग रात्रंदिवस वाहतूक मोठ्या प्रमाणात होत आहे. परंतु रेल्वे प्रशासनाने रेल्वे वरील मानसिक बळ कमी करण्यासाठी फाटकांऐवजी रेल्वे अंडर पास बोगद्याची निर्मिती केली असून हा अंडरपास बोगदा खूप धोकेदायक वळणाचा असून यामुळे वारंवार अपघात होतात. या बोगद्या-तून मागील दोन-तीन वर्षांपूर्वी पाण्याचा प्रश्न मोठा गंभीर झाला होता त्यात आता त्यांनी हा रेल्वे मार्ग रुंदीकरण करण्यासाठी अंडर पाच बोगद्याची रुंदी वाढवली





त्यामध्ये येवल्याकडे जाणारा मार्गाला वळण खूप कमी प्रमाणात असल्याने लांब वाहने अडकतात नवे नवे तर उतार जादा असल्याने एकमेकांवर आदळून अपघात होतो पण सुदैवाने आत्तापर्यंत कोणीही मृत्युमुखी पडले नाही मृत्युमुखी पडण्याची रेल्वे प्रशासन वाट तर नाही बघत ना असा प्रश्न जनतेला पडला आहे

परंतु रेल्वे प्रशासनाने हा रेल्वे अंडरपास बोगदा खूप अरुंद केल्याने व चढ जास्त केल्याने वाहन उतरताना चालकांना मोठी कसरत करावी लागते येवल्याकडून नांदगावकडे जाताना लांब वाहनांना वळण बसत नसल्याने पुढील भाग बोगद्यात जा-ताच मागील भाग हा अंडरपाच्या भिंतीला कठड्याला घासरतो त्यामुळे वारंवार अप-घात होत आहे. तरी रेल्वे प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन तात्काळ उपायोजना करावा अशी मागणी वाहनधारक करत आहे. तसेच वरून येणारा मालवाहतूक ट्रक व अंडरपास बोगद्यातून येवल्याकडे जाणारा ट्रक दोघांमध्ये एकमेकांचा टन बसत नसल्याने एकमेकावर प्रत्येक वेळा आदळ आहे.त्यात मोटरसायकल वाल्यांची कुठेही चुकी नसताना त्यांचा बळी जाण्याची जनताभीती व्यक्त करीत आहे. तरी शासनाने या अंडरपास बोगद्याचे रुंदीकरण वळण व उतार कमी करून योग्य उपाययोजना करावा अन्यथा तसे न झाल्यास ग्रामस्थ कुठलीही पूर्वसूचना न देता रेल्वे रोको करणार असल्याचा ग्रामस्थांची चर्चा आहे. ह्या अंडरपास बोगद्याचे काम रेल-वेचा कॉन्ट्रॅक्टर हा गेंड्याचा कातड्याचा असून पावसाळ्यात वाहन धारकांना मोठी कसरत करावी लागली त्यात हे काम अपुरे सोडून निकृष्ट प्रकारचे धातूर मातुर काम करून रेल्वे अंडरपास वाहतूक सुरू केला. परंतु हे होणारे अपघात त्यास कोण कारणीभूत आहे .रेल्वे प्रशासन की संबंधित ठेकेदार याची तात्काळ दिंडोरी लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रतिनिधी खासदार भास्करजी भगरे यांनी तात्काळ लक्ष घालून या कामाची सोडवणूक करावी अशी मागणी ग्रामस्थ करीत आहे.

**// येवला नांदगाव रस्त्यावरील नगरसुल गावचा रेल्वेचा बोगदाच्या निकृष्ट कामामुळे सर्व प्रवास्यांना व चालकांना डोकेदुखी ठरत आहे, या अंडरपास बोगद्यातून सर्व गाड्यांचे आकरमान विचारत न घेता चुकीच्या पद्धतीने बोगद्याचे कामकाज झालेले आहे, गाड्या अडकणे, अपघात होणे हे दैनंदिन आहे, प्रशासनाच्या दुर्लक्षपणामुळे व ठेकेदाराच्या हलगर्जीपणामुळे आधीच १० दिवसाचे काम करीत असताना ३ महिने काम सुरु ठेऊन देखील काम सुरळीत झालेले नाही, रेल्वेने बोगद्याचा डिजाईन मध्ये आवश्यक तो बदल करून सर्व प्रकारच्या गाडयांना सुरळीत प्रवास करता येईल असे स्ट्रक्चर तयार करावे,**
**प्रसाद पाटील माजी सरपंच नगरसुल//**

**//रेल्वे अंडर पास बोगद्याचे काम हे निकृष्ट दर्जाचा असून. हे काम पूर्णपणे निकृष्ट दर्जाचे झाले आहे. सदर काम टेंडर पद्धतीने न करता ठेकेदाराने मनमानी कारभार करून चुकीच्या पद्धतीने काम केले आहे तरी रेल्वे प्रशासनाने या कामाची दखल घेऊन हे काम योग्य रीतीने पूर्ववत उत्कृष्ट दर्जाने करावा अशी मागणी नांदेड रेल्वे विभागाचे सल्लागार समिती सदस्य यांनी खंत व्यक्त केले. त्याचप्रमाणे I बोगद्याचे काम सुरू असताना समिती सदस्य यांनी संबंधित कामगारांना अधिकार्यांना या कामाबाबत तक्रार देखील केली असताना त्याची कुठल्याही प्रकारची दखल न घेता हे काम केले आहे**
**सुभाष निकम -नांदेड विभाग रेल्वे सदस्य सल्लागार समिती चे नगरसुल प्रतिनिधी/**

# तांदळवाडी येथे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न

दै. आवाज वृत्तसेवा...

*श्री सिद्धबाबा धर्मनाथजी महाराज सेवाभावी संस्था संचलित, एम.डी काळे इंग्लिश मिडीयम पब्लिक स्कूल, तांदळवाडी येथे वार्षिक स्नेहसंमेलन तांदुळवाडी फेस्टिवल दि. ११ मार्च २०२६ रोजी उत्साहात संपन्न झाले.*

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे, संस्थेचे चेअरमन श्री दिनेश माधवराव काळे , श्री योगेश राठोड, श्री निलेश इप्पर ,श्री माधवराव दामोदर काळे, श्रीमती लताबाई काळे, श्री विजय काळे, श्री आबासाहेब काळे, सौ. नेहा दिनेश काळे, सौ. प्रिया आहेर, सौ.साक्षी अहिरे इ. उपस्थित होते.

कार्यक्रम अतिशय सुंदर नियोजन व सर्व शिक्षकांनी घेतलेल्या परिश्रमातून सर्व विद्यार्थ्यांनी खुपच सुंदर नृत्य, नाटक - श्री संभाजी महाराज यांची पुण्यतिथी वर आधारित संभाजी महाराजांचे जीवन चरित्र नाटकाद्वारे सादर केले, शेतकऱ्यांवर



आधारित जीवन हे एका नृत्यावर दर्शविले तसेच, सर्वच प्रकारच्या विविध कला सादर केल्या. खरतर सर्व शिक्षकांच्या मेहन-तीचे फळ आहे. छोटेसे रोपटे लावले होते आज वटवृक्षा मध्ये निर्माण झाले आहे. आज हजारो इतर शिक्षण संस्था लाखो रुपयांची प्रवेश फि घेऊन ही विद्यार्थ्यां मध्ये बदल होताना दिसत नाही परंतु आपली एम डी काळे इंग्लिश मिडीयम पब्लिक स्कूल तांदळवाडी ही अतिशय सुंदर पद्धतीने आपल्या मुलांना शिक्षण देत आहे खरतर शाळेतील सर्व शिक्षक परिश्रमाची पराकाष्ठा करुन आमच्या मुलांना चांगल्या प्रकारे शिक्षण देत आहेत.

असे म्हणतात कि पेणाची धार तल-वारी पेक्षाही जास्त असते आणि एका शिक्षकाकडे जगाला बदलण्याची ताकद असते त्यांच्याजवळ दोनच अश्र असतात एक त्यांचे ज्ञान व दुसरे त्यांचे शब्द

गुरुविना ज्ञान न मिळे
गुरूविना ना मिळे सन्मान
जिवन भवसागर तराया
चला वंदुया गुरूराया

एम डी काळे इंग्लिश मिडीयम पब्लिक स्कूल तांदळवाडी या संस्थेचे चेअरमन श्री दिनेश काळे सर,मुख्याध्यापिका श्रीमती नेहा काळे मॅडम उपमुख्याध्यापिका,सर्व शिक्षक, कर्मचारी वृंद यांचे आभार मानले.

# शिव मल्टी स्पेशलिस्ट हॉस्पिटलमध्ये महिला दिन उत्साहात साजरा

दै. आवाज वृत्तसेवा...

नाशिक येथील सातपूर परिसरातील पपया नर्सरी भागात असलेल्या शिव मल्टी स्पेशलिस्ट हॉस्पिटलमध्ये जागतिक महिला दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने हॉस्पिटलमधील सर्व महिला डॉक्टर्स, नर्से स तसेच कार्यालयीन महिला कर्मचाऱ्यांनी एकत्र येत केक कापून आनंद व्यक्त केला.



कार्यक्रमादरम्यानविविधमनोरंजनात्मक खेळांचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमामुळे हॉस्पिटलमध्ये आनंदी व उत्साही वातावरण निर्माण झाले. महिला कर्मचाऱ्यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत हॉस्पिटलच्या संचालकांकडून त्यांना भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी संचालक डॉ. राहुल पाटील, डॉ. छाया मोरे, डॉ. कल्याणी सावंत, डॉ. त्रिलोक पाटील, डॉ. नेहा राऊत, मुख्य कार्यकारी अधिकारी महेश ढोरे, व्यवस्थापक सचिन बोरणारे तसेच पुनम महाले, रुचिता साबळे, नंदिनी कावळे, दिप्ती बाविस्कर, योगिनी ससे, रेश्मा भवर, विमल तावडे आदी उपस्थित होते. महिला दिनाच्या निमित्ताने आयोजित या कार्यक्रमामुळे हॉस्पिटलमधील महिला कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला आणि सर्वांनी एकत्र येत आनंदाचा हा क्षण साजरा केला.

## महिलांसाठी उद्या विंचूर येथे डॉ. महेश्वर तगारे यांचा आरोग्यविषयक मार्गदर्शन कार्यक्रम

दै. आवाज वृत्तसेवा...

विंचूर : मातोश्री कै. हौसाबाई वामनशेठ दुसाने महिला ग्रा. बि. शेती सह. पतसंस्था मर्या., विंचूर तसेच सरस्वती एज्युकेशन सोसायटी संचलित न्यू ब्लॉसम इंग्लिश मिडीयम स्कूल व समर्थ प्राथमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून महिलांच्या आरोग्य व शारीरिक तंदुरुस्ती विषयी डॉ. महेश्वर तगारे यांचे मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.



शनिवार, दि. १४ मार्च रोजी सकाळी ९:३० वाजता न्यू ब्लॉसम इंग्लिश मिडीयम या शाळेत हा कार्यक्रम होणार असून महिलांचा आहार व आरोग्य विषयी ते महत्वाची माहिती सांगणार आहेत.

डॉ. महेश्वर तगारे यांचा मार्गदर्शन कार्यक्रम सर्व महिलांसाठी खुला असुन परिसरातील जास्तीत जास्त महिलांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# जनहित लोकशाही पक्षात गणेश कपाटे यांची महाराष्ट्र सहचिटणीसपदी नियुक्ती

दै. आवाज वृत्तसेवा...

मुंबई । प्रतिनिधी : जनहित लोकशाही पक्षाच्या संघटनात्मक विस्ताराच्या पार्श्वभूमीवर पक्षात नव्या जबाबदाऱ्यांची घोषणा करण्यात येत असून महाराष्ट्रातील अनेक मान्यवरांना पक्षाच्या महत्त्वाच्या पदांवर संधी दिली जात आहे. त्याच अनुषंगाने नांदेड येथील समाजसेवक गणेश अशोक कपाटे यांची महाराष्ट्र सहचिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीमुळे पक्षाच्या संघटनात्मक कामकाजाला अधिक बळ मिळणार असल्याचे मत पक्षातील नेत्यांनी व्यक्त केले.

मुंबई येथील पक्षाच्या कार्यालयात दि. ११ मार्च २०२६ रोजी झालेल्या एका कार्यक्रमात ही नियुक्ती जाहीर करण्यात आली. पक्ष प्रमुख अशोकराव आल्हाट यांच्या हस्ते गणेश कपाटे यांना अधिकृत नियुक्तीपत्र देण्यात आले. या प्रसंगी पक्षाचे उपाध्यक्ष संजय निंबाळकर तसेच मिरा रोडचे अध्यक्ष विजय मोरे आणि इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांच्या साक्षीने गणेश कपाटे यांनी पक्षाच्या विचारसरणीप्रती निष्ठा व्यक्त करत पक्ष संघटन अधिक मजबूत करण्याचा निर्धार व्यक्त केला.

गणेश कपाटे हे नांदेड जिल्ह्यातील गोविंद नगर परिसरातील रहिवासी असून सामाजिक आणि संघटनात्मक कार्यात सक्रिय आहेत. समाजातील विविध प्रश्नांवर त्यांनी सातत्याने काम केले आहे. जनतेच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणारे कार्यकर्ते म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत जनहित लोकशाही पक्षाने त्यांच्यावर महाराष्ट्र सहचिटणीस पदाची महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे.

या नियुक्तीबाबत बोलताना पक्ष प्रमुख अशोकराव आल्हाट यांनी सांगितले की, जनहित लोकशाही पक्ष हा सर्वसामान्य नागरिकांच्या हक्कांसाठी आणि लोकशाही मूल्यांच्या बळकटीसाठी कार्य करणारा पक्ष आहे. राज्यभरात संघटन मजबूत करण्यासाठी आणि जनतेपर्यंत पक्षाची भूमिका पोहोचवण्यासाठी समर्पित कार्यकर्त्यांना नेतृत्वाच्या भूमिका देण्याचा पक्षाचा प्रयत्न आहे. गणेश कपाटे यांची नियुक्ती ही त्याच दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल असल्याचे त्यांनी नमूद केले.

उपाध्यक्ष संजय निंबाळकर यांनीही यावेळी बोलताना गणेश कपाटे यांच्या कार्याचे कौतुक केले. त्यांनी सांगितले की, कपाटे यांच्यासारख्या कार्यकर्त्यांमुळे पक्षाच्या विचारसरणीला अधिक बळ मिळेल आणि राज्यभरात पक्षाचे काम अधिक प्रभावीपणे पुढे जाईल. पक्षाच्या विविध कार्यक्रमांमध्ये आणि सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग घेतल्यामुळे त्यांच्यावर ही जबाबदारी सोपवण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

या प्रसंगी गणेश कपाटे यांनी आपल्या नियुक्तीबद्दल पक्ष नेतृत्वाचे आभार मानले. पक्षाने दिलेल्या विश्वा-साला पात्र ठरण्याचा प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये पक्ष संघटना मजबूत करणे, कार्यकर्त्यांना एकत्र आण-णे आणि जनतेच्या प्रश्नांसाठी आवाज उठवणे यावर आपण विशेष भर देणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांनी गणेश कपाटे यांना शुभेच्छा देत त्यांच्या पुढील कार्यासाठी यशस्वी वाटचालीच्या शुभेच्छा दिल्या. जनहित लोकशाही पक्षाच्या संघटनात्मक विस्ताराच्या दृष्टीने ही नियुक्ती महत्त्वाची मानली जात असून आगामी काळात पक्षाच्या कार्यात अधिक वेग येईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

# जागतिक किडनी दिनानिमित्त अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये जनजागृती कार्यक्रम; ‘स्पेशल किडनी केअर पॅकेज’चेही उद्घाटन

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक, १२ मार्च : जागतिक किडनी दिनानिमित्त अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल, नाशिक येथे किडनीच्या आरोग्याबाबत जनजागृती करण्यासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात किडनीचे आजार, त्यांची लक्षणे, प्रतिबंध आणि वेळेवर उपचार याबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले.



या कार्यक्रमावेळी अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलचे नेफ्रोलॉजिस्ट डॉ. विपुल गट्टाणी, नेफ्रोलॉजिस्ट डॉ. इरावती वाघमारे, युरोलॉजिस्ट डॉ. श्याम तलरेजा तसेच सीव्हीटीएस तज्ज्ञ डॉ. प्रणव माळी उपस्थित होते. तज्ज्ञ डॉक्टरांनी किडनीचे आजार वाढण्यामागील कारणे, त्यांचे निदान आणि उपचार पद्धती याबाबत सविस्तर माहिती दिली.

डॉ. विपुल गट्टाणी यांनी सांगितले की, मधुमेह, उच्च रक्तदाब, लठ्ठपणा, अनियमित आहार आणि कमी पाणी पिण्याच्या सवयींमुळे किडनीच्या आजारांचा धोका वाढतो. किडनीचे आजार सुरुवातीच्या टप्प्यात स्पष्ट लक्षणे न दिसल्यामुळे अनेकदा उशिरा लक्षात येतात. त्यामुळे नियमित आरोग्य तपासणी, रक्तदाब आणि रक्तातील साखरेचे नियंत्रण राखणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

डॉ. इरावती वाघमारे यांनी किडनीच्या आरोग्यासाठी योग्य जीवनशैलीचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, पुरेसे पाणी पिणे, संतुलित आहार घेणे, नियमित व्यायाम करणे आणि अनावश्यक औषधांचा वापर टाळणे या गोष्टी किडनीचे आरोग्य टिकवण्यासाठी आवश्यक आहेत.

डॉ. श्याम तलरेजा यांनी किडनीशी संबंधित शस्त्रक्रिया आणि युरोलॉजिकल आजारांबाबत माहिती देत सांगितले की, किडनी स्टोन, मूत्रमार्गातील अडथळे किंवा इतर समस्या वेळेवर ओळखून योग्य उपचार केल्यास गंभीर गुंतागुंत टाळता येते.

याप्रसंगी रुग्णांच्या किडनीच्या आरोग्याची नियमित तपासणी सुलभ व्हावी यासाठी ‘स्पेशल किडनी केअर पॅकेज’ चेही उद्घाटन करण्यात आले. या विशेष पॅकेजमध्ये CBC, Serum Creatinine, Serum Uric Acid, Urine Routine या महत्त्वाच्या तपासण्या तसेच नेफ्रोलॉजिस्टचा सल्ला अवघ्या रु. ४९९ मध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे, ज्यामुळे नागरिकांना किडनीच्या आरोग्याची वेळेवर तपासणी करणे अधिक सोपे होणार आहे.

यावेळी बोलताना अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलचे केंद्र प्रमुख श्री. अनुप त्रिपाठी यांनी सांगितले की, किडनीचे आजार अनेकदा सुरुवातीच्या टप्प्यात कोणतीही स्पष्ट लक्षणे न दाखवता वाढत जातात. त्यामुळे वेळेवर तपासणी आणि जनजागृती अत्यंत महत्त्वाची आहे. जागतिक किडनी दिनाच्या निमित्ताने आयोजित या कार्यक्रमाद्वारे नागरिकांमध्ये किडनीच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणे हा आमचा उद्देश आहे. तसेच ‘स्पेशल किडनी केअर पॅकेज’च्या माध्यमातून नागरिकांना आवश्यक तपासण्या सुलभ आणि किफायतशीर दरात उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे.

जागतिक किडनी दिनानिमित्त नागरिकांनी आपल्या किडनीच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देऊन नियमित तपासणी, निरोगी जीवनशैली आणि तज्ज्ञांचा सल्ला घेण्याचे आवाहन डॉक्टरांनी केले.

अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल, नाशिक येथे किडनीशी संबंधित आजारांचे निदान, डायलिसिस सुविधा, शस्त्रक्रिया तसेच तज्ज्ञ उपचार आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने उपलब्ध आहेत.

# डायलिसिस रुग्णांसाठी ‘आरोग्यदायी सहल’ जागतिक किडनी दिनानिमित्त किम्स मानवता हॉस्पिटलचा अभिनव उपक्रम

**दै. आवाज वृत्तसेवा...**

भाऊसाहेब हुजबंद, नाशिक : जागतिक किडनी दिनाच्या निमित्ताने किम्स मानवता हॉस्पिटल, नाशिक यांच्या नेफ्रॉलॉजी विभागातर्फे डायलिसिस रुग्णांसाठी विशेष ‘आरोग्यदायी सहल’ आयोजित करण्यात आली होती. या उपक्रमांतर्गत डायलिसिस रुग्णांनी धम्मगिरी इंटरनॅशनल इन्स्टट्यूट इगतपुरी येथे भेट देत ध्यान, शांतता आणि सकारात्मक वातावरणाचा अनुभव घेतला.




डायलिसिस रुग्णांसाठी केवळ उपचार नव्हे, तर मानसिक शांती आणि सकारात्मक ऊर्जा देखील तितकीच महत्त्वाची आहे. अशा उपक्रमांमुळे रुग्णांमध्ये नवीन उत्साह निर्माण होतो आणि उपचार प्रक्रियेतही सकारात्मक परिणाम दिसून येतात.

– **डॉ. मोहन पटेल**, Head - Nephrology Kidney Transplant, किम्स मानवता हॉस्पिटल , नाशिक

या सहलीचा मुख्य उद्देश डायलिसिस रुग्णांचे मानसिक आरोग्य बळकट करणे, तणाव कमी करणे आणि सकारात्मक जीवनशैलीचा संदेश देणे हा होता. दीर्घकाळ चालणाऱ्या उपचारांमुळे अनेक रुग्ण मानसिक थकवा अनुभवतात.

अशा वेळी निसर्गरम्य आणि शांत वातावरणात घालवलेला वेळ त्यांना नवचैतन्य देणारा ठरतो. या उपक्रमाचे मार्गदर्शन नेफ्रॉलॉजी विभागाचे प्रमुख डॉ. मोहन पटेल यांनी केले. रुग्णांसोबत हॉस्पिटलचे डॉक्टर, नर्सिंग स्टाफ आणि समन्वयक उपस्थित होते.

या सहलीदरम्यान रुग्णांना ध्यान–धारणा केंद्राची माहिती देण्यात आली तसेच शांत आणि सकारात्मक वातावरणाचा अनुभव घेण्याची संधी मिळाली.

रुग्णांनी या उपक्रमाचे स्वागत करत अशा कार्यक्रमांमुळे मानसिक समाधान, आत्मविश्वास आणि सकारात्मक ऊर्जा मिळते, असे किम्स मानवता हॉस्पिटल चे सीओओ डॉ निलेश सिंग यांनी सांगितले.

## यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांचे अभिवादन

**दै. आवाज वृत्तसेवा...**

सातारा (दि. १२) : आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार आणि राज्याचे पहिले मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या ११३ व्या जयंतीनिमित्त आज उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी कराड येथील प्रीती संगमावर जाऊन त्यांच्या समाधीचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी समाधी स्थळावर पुष्पांजली वाहून अभिवादन केले.

याप्रसंगी जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक तुषार दोशी, माजी आमदार बाळासाहेब पाटील यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी, नागरिक तसेच विविध शाळांचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांचे समाधी स्थळ शक्ती देणारे – उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांचे समाधी स्थळ हे नेहमी शक्ती स्थळ राहिले आहे. स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजित पवार नेहमीच या स्थळाला भेट देत होते. त्यांचे नेहमी हे श्रद्धास्थान व शक्तिस्थान राहिले आहे. त्यांच्याच विचारांवर स्वर्गीय अजित पवार यांनी काम केले आहे. मी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यावर दोन फेब्रुवारी रोजी समाधी स्थळावर अभिवादन केले होते. त्यानंतर स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त आज अभिवादन करण्यासाठी आले आहे. पुढील काळात त्यांच्याच विचारांवर काम करणार असल्याचेही उपमुख्यमंत्री सुनित्रा अजित पवार यांनी यावेळी सांगितले.

स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या ‘शब्द सुरांची भावपूर्ण आदरांजली’ या विशेष कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी प्रमुख उपस्थिती लावली. शब्द सुरांची भावपूर्ण आदरांजली’ या कार्यक्रमाद्वारे स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांना आणि कार्याला संगीतातून उजाळा देण्यात आला.

# गायिका सुलोचना चव्हाण यांच्या ९३ व्या जयंतीनिमित्त सांस्कृतिक कार्य विभागाची स्वरांजली

**दै. आवाज वृत्तसेवा...**

मुंबई, दि. १२ : महाराष्ट्राच्या लावणी परंपरेला नवे आयाम देणाऱ्या ज्येष्ठ गायिका सुलोचना चव्हाण यांच्या ९३ व्या जयंतीनिमित्त सांस्कृतिक कार्य संचालनालय मुंबई यांच्यावतीने सोळावं वरीस धोक्याचं – अजरामर लावण्यांचा स्वरोत्सव हा विशेष सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम शुक्रवार, १३ मार्च २०२६ रोजी रात्री ८:३० वाजता मास्टर दीनानाथ मंगेशकर नाट्यगृह, विलेपार्ले (पूर्व), मुंबई येथे होणार आहे.




मराठी चित्रपटसृष्टी आणि लोकसंगीताच्या क्षेत्रात सुलोचना चव्हाण यांनी आपल्या दमदार आवाजातून लावणीला वेगळे स्थान मिळवून दिले. सोळावं वरीस धोक्याचंसारख्या अजरामर लावण्यांमुळे त्यांनी रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवले. त्यांच्या गायकीतून लावणीच्या परंपरेला नवी ओळख मिळाली आणि मराठी सांस्कृतिक वारसा अधिक समृद्ध झाला. त्यांच्या स्मरणार्थ आयोजित हा स्वरोत्सव मराठी लोकसंगीताच्या परंपरेचा गौरव करणारा ठरणार आहे.

या कार्यक्रमात सुप्रसिद्ध गायिका संपदा माने आणि संज्योती जगदाळे या सुलोचना चव्हाण यांना स्वरांजली अर्पण करणार आहेत. कार्यक्रमाचे निवेदन निवेदक परेश दाभोळकर करणार असून संगीत संयोजन प्रशांत लळित यांचे असणार आहे.

सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यावतीने आयोजित हा कार्यक्रम महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार आणि सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे.

या स्वरोत्सवासाठी विनामूल्य प्रवेशिका ११ मार्चपासून मास्टर दीनानाथ मंगेशकर नाट्यगृहावर उपलब्ध आहेत. मुंबई व परिसरातील नागरिक, संगीतप्रेमी आणि लावणी रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या अजरामर लावण्यांच्या स्वरोत्सवाचा आनंद घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालक श्रीराम पांडे यांनी केले आहे.

